महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**परिपत्रक :-**

जा. क्र. : तंशिविकापु/शै.वि-३/संस्था बदल /४३७९
दिनांक : २०/०९/२०२२

**प्रति,**
प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था (पुणे विभाग)

**विषय : मुल्यांकन व दर्जा मानांकन (NAAC/NBA Accreditation) प्राप्त करण्याचा कृती आराखडा व कृती कार्यक्रमाची माहिति सादर करणेबाबत..**

**संदर्भ :** मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा. मुंबई यांचे पत्र जा.क्र. १० व २/एनडीएम/ एनबीए मानांकन/२०२२/८८२ दि.१६.०९.२०२२

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये देशाच्या सातत्यपुर्ण प्रगतीसाठी तसेच वैश्विक पातळीवर अग्रेसर राहण्यासाठी सर्वांना दर्जेदार शिक्षण देण्याच्या दृष्टीकोनातून नवीन शैक्षणिक धोरण (NEP 2020) आपल्या देशाने अंगिकारले असून त्याची अंमलबजावणी सुरु आहे. उच्च दर्जाचे शिक्षण उपलब्ध करताना ते गुणवत्तेबरोबरच दर्जेदार व नाविन्यपूर्ण असणेही आवश्यक आहे.

याच दृष्टीकोनातून सक्षम शिखर संस्थेकडून व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना मूल्यांकन व दर्जा मानांकन प्राप्त करण्याच्या ( Assessment and Accreditation) सूचना तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या शिखर संस्था असलेल्या अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने वेळोवेळी दिलेल्या आहेत. त्यानुसार संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना NAAC/NBA Accreditution करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यास अनुसरुन काही संस्थांनी त्यांचे मूल्यांकन व दर्जा मानांकन प्राप्त करुन घेतलेले असले तरी अशा संस्थांची संख्या अपेक्षेएवढी आढळून येत नाही. बऱ्याचशा संस्थांनी त्यांचे मूल्याकंन व दर्जा मानांकन प्राप्त करुन घेतलेले नाही.

आता नवीन शिक्षण धोरणामध्ये (NEP 2020) दर्जात्मक शिक्षण आणि दर्जेदार शैक्षणिक संस्थांना देण्यात आलेले प्राधान्य विचारात घेता संस्थांनी मूल्यांकन व दर्जा मानांकन प्राप्त करुन घेणे अत्यावश्यक आणि अपरिहार्य आहे. अद्याप NAAC/NBA Accreditation मूल्याकंन व दर्जा मानांकन प्राप्त करुन घेण्यात आलेली नाही. **अशा संस्थेनी NAAC/NBA Accreditation मूल्याकंन व दर्जा मानांकन प्राप्त करुन घेण्यासाठी तयार करणेत आलेला कृती आराखडा/ कृती कार्यक्रम (Action Plan) व ज्या संस्थांनी मूल्यांकन व दर्जा मानांकन प्राप्त करुन घेतला आहे. अशा संस्थेनी दि.२९.०९.२०२२ पर्यंत https://forms.gle/hq8ra8b7daWjGEPQ8** या गुगल फॉम मध्ये माहिती सादर करण्यात यावी. जेणेकरुन सदरची माहिती संचालनालयास सादर करणे शक्य होईल.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता